महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महानिर्मिती कंपनी

## कार्यकारी सारांश

महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती कंपनी) पारस संच क्र, ३ च्या प्रकरणी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दर अटी व शर्ती) विनियम, २००५ यानुसार पहिल्या बहुवर्षीय वीजदर नियंत्रण कालावधी करिता वीजदर निर्धारण याचिका सादर करीत आहे. हे निर्धारण सदर प्रकल्पावर ३० मार्च २००८ पर्यंत झालेला खर्च आणि १ एप्रिल २००८पासून पुढे आर्थिक वर्ष २००८-०९ आणि २००९-१० मध्ये कराव्या लागणाऱ्या खर्चाच्या अंदाजावर आधारित आहे.

वीजदर सादरीकरणाच्या उद्देशाने सदर प्रकल्पाचा भांडवली खर्च ३० मार्च २००८ रोजी रु,१४३९.३२ कोटी असून त्यामध्ये उभारणी कालावधीतील व्याजाचा रु. २१६.०६ कोटी समावेश आहे, याचा तपशील याचिकेच्या मुख्य मजकुरात दिलेला आहे. मत्तेच्या निरनिराळ्या प्रवर्गातील भांडवली खर्चाची विभागणी जोडपत्र एक मधील प्रपत्र ४.१ यात दिल्याप्रमाणे आहे.

निर्धारित वेळापत्रकानुसार प्रकल्प क्रियान्वित होऊ न शकण्याच्या अन्य कारणांबरोबर प्रमुख कारण म्हणजे मे. भेल यांच्याकडून सामग्रीचा अनुक्रमाने पुरवठा होण्यास लागलेला विलंब, हे आहे. कंपनीने प्रकल्पाच्या क्रियान्वयनास विलंब झाल्याच्या कारणास्तव जानेवारी २००९ मध्ये मे, भेल यांच्याकडे रु. ६७.९१ कोटी एवढया रकमेची निर्धारित नुकसान भरपाई मागितली आहे. तथापी या भरपाईची अंतिम रक्कम योग्य वेळात निश्चित करण्यात येईल.

महानिर्मिती कंपनीचे निवेदन आहे की, पारस संच क्र.३, दिनांक ३१ मार्च २००८ रोजी क्रियान्वित करण्यात आलेला आहे. तथापी, याचिकेच्या मुख्य मजकुरात नमूद केलेल्या कारणांस्तव, वीजदर विनियमांत सुचविल्या प्रमाणे १८० दिवसांच्या कालावधीत तो स्थिर होऊ शकला नाही. संचा कडून त्यासाठीचे प्रमाणकानुसार मापदंड डिसेंबर २००८ अखेर साध्य करता येतील असे अपेक्षित आहे, म्हणून महानिर्मिती कंपनीने पारस संच क्र, ३ च्या बाबतीत वीजदर विनियम २००५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रमाणकानुसारी मापदंडाच्या आधारे आर्थिक वर्ष २००८-०९ आणि २००९-१० मधील वीजनिर्मिती खर्चाचा सारांश काढला आहे, तो पुढीलप्रमाणेः

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

रुपये कोटीत

| | | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|
| घसारा | कोटी | ५१.६१ | ५१.९६ |
| घसाऱ्यासाठीचा अग्रीम | कोटी | ५१.६९ | ५१.३५ |
| संचालन व सुव्यवस्था खर्च | कोटी | ३१.२४ | ३२.९२ |
| दीर्घकालीन कर्जावरील व्याज | कोटी | १२१.७१ | ११२.६५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | कोटी | १६.८१ | १७.५२ |
| समभाग भांडवलावरील परतावा | कोटी | ४८.७६ | ४८.७६ |
| आयकर | कोटी | ५.५२ | ५.५२ |
| एकूण स्थिर आकार | कोटी | ३२७.३५ | ३२०६.६९ |
| एकूण आस्थिर आकार | कोटी | २०४.२४ | २२८.७९ |
| एकूण आकार | कोटी | ५३१.५९ | ५४९.४८ |
| एकूण वीजनिर्मिती (द,ल, युनिट | कोटी | ९६३.५८ | १५९४.३२ |
| चल परिव्यव ( रु,/ कि,वॉ,तास) | | २.१२ | १.४४ |

माननीय आयोगास अर्जदार प्रार्थना करतात कीः

क) याचिका सादर करण्यास झालेला विलंब क्षमापित करावा आणि ती दाखल करुन घ्यावी,

ख) वर्ष २००८-०९ च्या उर्वरित कालावधीसाठी आणि वर्ष २००९-१० साठी पारस संच क,३ करिता सादर केलेला वीजदर मान्य करावा,

ग) पारस संच क,३चे स्थिरीकरण होईपर्यंत म्हणजे डिसेंबर २००८ अखेरपर्यंत त्या संचाचा प्रत्यक्ष संचालन मापदंडानुसार चल परिव्यय मान्य करावा

घ) महावितरण कंपनीस ३१ मार्च २००८ पासून पुरवलेल्या विजेच्या बाबतीत, माननीय आयोगाने निश्चित करुन दिलेल्या अंतिम वीजदराच्या आधारे वसूल कराचयाच्या वीजदर फरकाची रक्कम वसूल करण्यास महानिर्मिती कंपनीला मुभा द्यावी.

च) विजेच्या एककाचा (युनिटचा) अंतिम वीजदर निर्धारित करण्यासाठी वापरलेले व्यवहार्य एक्सेल मॉडेल अर्जदारांना उपलब्ध करुन द्यावे,

छ) याचिकेत काही त्रुटी असल्यास त्या क्षमापित कराव्यात आणि माननीय आयोगास नंतरच्या टप्यात आवश्यक असेल ती आवश्यक माहिती सादर करण्यास अर्जदारांना मुभा द्यावी,